# <u>प्रेसनोट दि.०५/०२/२०१८</u>

## जेष्ठ नागरीकाकरिता हेल्पलाईन नंबर ८६६९६६०९५४४ चा शुभारंभ

---------------------oooooooooooo----------------------

आज दिनांक ०५/०२/२०१८ रोजी दुपारी १२.०० वा. पालघर जिल्हा पोलीस दलातर्फे जेष्ठ नागरीक हेल्पलाईन शुभारंभ करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे प्रमुख म्हणुन जेष्ठ नागरीक श्रीमती राधा कनोजिया, वय ७० वर्षे, रा.संतोषभवन, नालासोपारा पुर्व, ता.वसई हया होत्या. सदर कार्यक्रमास मा.पोलीस अधीक्षक,पालघर श्री.मंजुनाथ सिंगे, अपर पोलीस अधीक्षक,वसई श्री.राजतिलक रोशन, व वसई विभागातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरवात शहीद जवांनाना श्रद्धांजली अर्पण करुन व दिपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर स्वागत समारंभ करण्यात आला. मा.पोलीस अधीक्षक,पालघर यांचे स्वागत श्री. सरदार नरेंद्र सिंग,अध्यक्षवसई जेष्ठ नागरीक संघ, यांनी केले, व अपर पोलीस अधीक्षक,वसई मा.श्री.राजतिलक रोशन यांचे स्वागत श्री. चिंतामण नाईक, आगाशी जेष्ठ नागरिक संघ, यांनी केले. शेठ विद्या मंदिर हायस्कुल,वंसतनगरी च्या प्राचार्य अंशु मॅडम यांचे स्वागत जेष्ठ नागरीक श्री.शरद जोशी, जेष्ठ नागरीक संघ नवघर, यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा.श्री.राजतिलक रौशन, अपर पोलीस अधीक्षक,वसई यांनी केले.

सदर कार्यक्रमात जेष्ठ नागरीक १) श्रीमती कुसुमताई हिरामण गागुर्डे, वय ६५ वर्षे, २) श्रीमती मनिषा प्रविण कंसारा, वय ६४ वर्षे, ३) ॲड.श्री.रमाकांत वाघचौरे, वय ६४ वर्षे, ४) श्री.गंगाराम पाटील, वय ६५ वर्षे, यांनी आपले विचार व्यक्त केले. त्याचप्रमाणे मा.पोलीस अधीक्षक,पालघर श्री.मंजुनाथ सिंगे, यांनी आपले विचार मांडले.

सदर जेष्ठ नागरीक हेल्पलाईन क्रमांक <u>८६६९६६०९५४४</u> चे अनावरन श्रीमती **राधा कनोजिया**, वय ७० वर्षे, यांच्या हस्ते करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मा.श्री.अनिल पाटील, पोलीस निरीक्षक, माणिकपुर पोलीस ठाणे, यांनी केले.